म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. १५११

# काव्यश्री

— श्री. वि. गाडगीळ

REFBK-0011952
REFBK-0011952

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम २८२९५ दि.
ग्रंथांक ९४८११ नों. दि. १८-२-६१
११९५२

'काव्यश्री' चें

# काजळ-कुंकू

मनुष्याला व्यवसाय कोणताहि करावा लागला तरी त्याचा आवडता असा एकादा वेगळाच छंद असतो; आणि त्या त्याच्या छंदाचा बोलबाला झालेला नसला तरी कालांतरानें त्यांत त्यानें बरीच माया केलेली असल्याचें प्रगट होतें आणि त्याच्या चहात्यांना एक गोड धक्का अनुभवावयास मिळतो. श्रीयुत गाडगीळ ह्यांच्या बाबतींतहि असेंच कांहींसें प्रत्ययास येत आहे. त्यांचा पेशा वकीलीचा. वादीच्या किंवा प्रतिवादीच्या बाजूनें कोर्टांत कायद्याचा अर्थ प्रतिपादून आपल्या अशीलाला फायदेशीर असा न्यायदेवतेचा कौल मिळविणें ह्यांतच केवळ त्यांची हयात चालली आहे असें नसून, कायद्यांतील उणीवा, अन्याय, अपायकारकपणा, वगैरेंचा उहापोह करून जनतेला जागे करणें आणि धोके दाखवून देणें हीहि त्यांच्या वकीलीची दुसरी एक महत्त्वाची बाजू आहे. अर्थात् साहित्य-संगीत-कला यांचेकडे लक्ष द्यायला त्यांना फुरसत अल्पच असावी, हें उघड आहे. तशी त्यांना साहित्यादि कलांगांची आवड आहे, हें 'काव्यश्री' वरून दिसून येईल. पण फुरसुतीच्या अभावीं ही वेल खुरटलेली असावी, हा कुणीहि तर्क करूं शकेल. काव्यरचनेंत छंद-जाति-वृत्त ह्यांच्या स्वरूपांबाबत जो काटेकोरपणा हवा असतो तो तितकासा ह्या पुस्तिकेंत ठेवला गेलेला नाही, असें जें दिसतें तें ह्याचमुळें. मिरवणुकीला निघालेल्या ललनेचा ठाकठीक साजशृंगार ह्या काव्यश्रीच्या ठिकाणीं दिसून येत नाहीं. कार्यव्यापृत गृहिणीचे केस कांहिंसे

सैल झालेले असावेत, नेसण जरासें चुरगळलेलें असावें, नीटनेटकेपणा ढळलेला असावा. त्याप्रमाणें ह्या 'काव्यश्री' ची वेषभूषा आहे. नाहींतर "झुरलें परी न सुकले" ह्या भावमधुर कवितेच्या चालींत आडखळल्यासारखें वाटलें नसतें.

तथापि कौतुक हें कीं, फावला वेळ काव्यरचनेसारख्या, सात्विक आनंद देणाऱ्या, निर्मितींत खर्चून श्री. गाडगीळ हे आपलें मनोविनोदन साधीत आले आहेत. दोन कर, झुरलें परी न सुकलें, स्मारक कुणाचें, ह्या कविता हृद्य वाटतील, गति-प्रगति आणि उभारलेला पुतळा ह्या कणिकांतला तथ्यांश मार्मिक आहे. "आयुष्याची पैज" ह्या कणिकेंतला भाव श्री. गाडगीळ ह्यांच्या अंतर्मनांत सध्यांच घोळत असावा. त्यांच्या ह्या वाढदिवसाच्या मंगल सोहळ्यांत त्यांचे आप्त-स्वकीयहि त्यांचेकडे पाहून भरल्या अंतःकरणानें असेंच म्हणत नसतील का, कीं—

**आयुष्याची पैज जिंकिली तीर गाठला समोरचा**
**मध्यान्हींतुनि सायंतनला डौलत आला रवि भाग्याचा**

निदान, मी तरि असेंच म्हणतों.

**— यशवंत दि. पेंढरकर**

REFBK-0011952
REFBK-0011952
११९५२

# काव्य श्री

## स्वारी अजुनी नच ती आली

स्वारी अजुनी नच ती आली—
रात्र उलटली, पहाट झाली ।
स्वारी अजुनी नच ती आली ॥ ध्रु० ॥
जाइ-जुईचा मंडप फुलला । तारा गेल्या अपुल्या सदना ॥
पक्ष्यांची जरि किलबिल झाली । स्वारी अजुनी नच ती आली ॥
पूर्व दिशा ही खुदकन हंसली । लाली हळुं हळुं गालीं चढली ।
रविराजाची स्वारी आली । स्वारी अजुनी नच ती आली ॥
वाट पाहुनी थकुनी गेलें । बसुनी बसुनी अंग मोडलें ।
अंधारीही नयनां आली । स्वारी अजुनी नच ती आली ॥
शीण येऊनी मागे पडली । वरचेवरी तिज पतीनें धरली ।
निज मांडीची उशी दीधली । स्वारी अजुनी नच ती आली ।
हुसक्यानें ती जागी होई । डोळे चोळुनी वर जों पाही ।
विस्मित लज्जित नयन बोलले—' कधी ग बाई येणें झालें ॥ '

' स्त्री ' मासिक, डिसेंबर १९३१

# दोन कर

याहूनी अपुली प्रभावळ जगीं आली निशा सुंदरी ।
तार्‍यांचीं जणुं कुंतलांत तिचीया होती फुलें हांसरी ॥
होता शोभत चांद शेखरमणी नीलांबरीं शीतसा ।
शांतीचा अवघा विलास जगती होता सुरूं रम्यसा ॥

आले तों कर आंत शीत विधुचें गोंजारिण्या मन्मुखा ।
मायेचें जणुं पांघरुण पडलें, दे गोड निद्रासुखा ॥
सौख्याची सरली सुधा विनटले सूर्यप्रकाशें जग ।
आले तों कर आंत सांगत मला " ही सृष्टिदेवी बघ—

उत्साहें जणुं रोमरोमिं नटली, उत्फुल्ल शोभे कशी !
शय्याधीन अशा अजूनी तुजला वाटे न लज्जा कशी ? ॥
पक्ष्यांचा गण गात मंजुळ रवें झाला विहारी नभीं ।
होई तूं रत उद्यमी सुखभरें भोगी विलासा जगीं ॥ "
—मातेचे कर प्रेमपूर्ण बनुनी संतोषवीती सुता ।
इच्छितो परि त्यास पितृकर ते उद्योगी होण्या रता ॥

साप्ताहिक सकाळ, जून १९३३

# झुरलें परी न सुकलें....

झुरलें परी न सुकलें राया... तव चिंतनीं ।
धरली खरी ही मूर्ति बरवी सदा मम मनीं ॥
येणार तूं मनीचीं खात्री असे रात्रंदिनीं ।
ती जाहली सदाची एक मला संजीवनी ॥ १ ॥

कष्टी न मी दिसावी—येशी जरी अकस्मात ।
पाहूनिया गुलाबी कांती तनुवरी तात ॥
आनंद तो दुणावा जरीं हो पुढें तुझा हात ।
हा सर्वकाळ धरला मनीं एक हेतु दिन-रात ॥ २ ॥

परि आज पावलें तें स्वप्न मम विराम ।
कळलें पुरें होणार ना तुझी भेट अभिराम ॥
केवीं हौस मी करूनी तुझ्यास्तव रंगविलें हें मंदिर ।
अत्तरदाणी, फुलदाणी ही ठेविली सतत तयार ॥
प्रसन्न व्हावें चित्त तुझें हें येता तूं माघार ।
बागबगिचा फुलवुनी सारा सज्जचि साजशृंगार ॥

१६ नोव्हेंबर १९४५

## स्मारक कुणाचें ?

कालिंदी जळिं पाय सोडुनि बसे वाटे कुणी मानिनी ।
प्रीती सात्विक कीं, जणूं अवतरे शुभ्र स्वरूपें जनीं ॥
ऐसें ताजमहाल-स्मारक जगीं मुम्ताजच्या प्रीतीचें ।
जेथें रम्यकला-विलास रमवी, ज्याला तुळा ना दिसे ॥
वाटें एकवटूनि येथ बसलें सौंदर्य विश्वांतिल ।
ज्याचा दर्शनलाभ देइं रसिकां आनंद स्वर्गांतिल ॥
सौंदर्यें परि त्या भुलोनि विसरे मुम्ताज सारें जग ।
कोणाचें मग तें असेल तुमजे केलें बरें स्मारक ? ॥

१९३७

## तयासी काय हो त्याचें ?

भिरभिरां फिरें कीं गोफण । भळभळा येत तें रक्त ॥
पांखरां लाविलें मलम । तयासी काय हो त्याचें ॥ १ ॥

तापल ऊन भंवताली । टाकतें मान सुम खाली ॥
जलाची धार जरि धरिली । तयासी काय हो त्याचें ॥ २ ॥

ताडिलें दुष्ट शब्दांनीं । घरें तीं पाडिलीं हृदयीं ।
तोषिलें चाटु वचनांनीं । तयासी काय हो त्याचें ॥ ३ ॥

११९१२

# ग ग न दे व

( गगनदेव नामक विमानांतून प्रथम प्रवास केला त्यावेळीं )

अधांतरी वरींवरीं चाललें विमान हें तरी—
भूमीच्या भावना सोडूनि चाललें घनांतरीं ।
' गगनदेव ' हा वरी-वरी नेतसे पहा अधांतरीं—
सोडुनी दुर्ग पर्वत हें दुर्गम कीं धरेवरीं ।
मान उंच करुनि त्याकडे न पाहणें कधि जुळे।
आज तेची डोंगर-पर्वत वाटतात वारुळें ॥

२५ एप्रिल १९५३

## मि त्र – भे ट

मित्राला खुणवूनि प्रेमळपणें
"येना" असें सांगत।
आशेच्या बहु रम्य कोमल उषा
होत्या मनीं खेळत ॥

ऐकूनी विनती करां पसरुनी
हो क्रीडना तत्पर।
आशेची परिपूर्तता हंसुनीया
नाचे जणूं सुंदर ॥

१९२७

# चाललों अम्हीं अतां रणांगणावरीं

चाललों अम्ही अतां रणांगणावरीं ।
थोपवूनि कोणी ना अम्हां मुळीं धरी ॥

एक नाद, एक घोष, ध्येय गुंगवी ।
कान, नेत्र, बुद्धि सर्व राहि त्यावरी ।
हिंदुधर्म रक्षणीं
क्षिती न देह पातनीं ।
शत्रु मातला । डर न आजला ।
संघे । आजी । आम्हीं मार्ग हेरला ॥

१९३९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...... वि: ......
क्रमांक ...... नों: दि: ......

# पुढें चला

पुढें चला । पुढें चला । मार्ग आक्रमा ॥ ध्रु० ॥
शत्रु नजिक दारीं येउनीही ठेपला ।
धीर धरुनी । छाती करुनी । शत्रु आडवा
पुढति पुढति चाल करा । विजय तो तुम्हां ॥

गगन कोसळो । धरणी हादरो ।
मृत्यू तो वरो ।
पुढति पुढति चाल करा । विजय तो तुम्हां ॥

१९३९

# वाजव आतां रणभेरी

विसर्जिली मी स्वप्नें सारीं
वाजव आतां रणभेरी ॥ ध्रु० ॥

नातीं होतीं जीं ज्याची ।
गेलीं तुटूनि सारी ॥

चढलो आतां वेदिवरी ।
पर्वा न आतां मुळीं उरीं ॥

कर्तव्याची ही चाकोरी ।
मनांत मी ती एक धरीं ॥

कुठे न थांबतो अतां तरी ।
पुढेंच जाईं ।
शत्रू मारी ।
कधीं न येईं माघारी । वाजव आतां रणभेरी ।

१९५९

अनुक्रम २८२१६ वि:
क्रमांक ७५९१ नों: दि: ५।०५
१०-२-६

# कणिका

## आयुष्याची पैज

आयुष्याची पैज जिंकली तीर गाठला समोरचा ॥
मध्यान्हींतूनि सायंतनला डौलत आला रवि भाग्याचा ॥१॥

## पुराण-पुरुष

नाविन्याची चमक तयामधिं नाहीं ती अगदी ।
पुराण-पोथी घेउन बसतो होउन तो दशग्रंथी ॥

## गति प्रगति

म्हशीच्या पाठीवर कावळा नी घोड्याच्या पाठीवर सरदार ।
दोन्हीं चालतात अपुला पथ विना सायास ॥
सरदार जातो वाटेल तिकडे मनास ।
कावळा न जाणे कुठें अपुला प्रवास ॥

## उभारलेला पुतळा

पैसे ते अगणीत खर्च करुनी केला असे पूतळा ।
स्फूर्ती त्यांतुनी ती कुणां कधिं मिळें हा प्रश्न कीं आगळा ॥
पक्षांना परि एक आश्रय आतां उत्कृष्ट हा लाधला ।
डोक्याच्यावर त्या तुझ्या बघ असे हा बैसला कावळा ॥

११९५२

## न्यून

पुष्पें शिरीं हे उधळोत लोक
धाडोत पत्रें स्तुतिची अनेक ।
आली जरी चालुन द्रव्य–राशी
आहे परी न्यून तुझ्या यशासीं ॥ १ ॥

जीने तुझे लाड अतीव केले,
शरीर सौख्यास्तव कष्टविलें ।
पाठीवरी ती फिरवून हातां
पोटीं धराया न जगांत माता ॥ २ ॥

होतां तुला दुःख कितीहि थोडें,
झालें जिचें चित्त सदैव वेडें ।
सौख्यें तुझ्या सौख्य जिच्या जिवाला ।
ती माय नाहीं दिसणार तूला ॥ ३ ॥

—माता नसे या बघण्या यशास ।
हें शल्य बोचें मम मानसास ॥ ४ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम २८२९८ दि: ...

# होवोत दीप्तीमय....

( गुरुदेव रविंद्रनाथ टागोर यांच्या गीताञ्जलींतील पुढील उतारा 'चालना' मासिकांत आला होता तो वाचून सुचलेले विचार )

## गीताञ्जली .... .... ....

वैराग्यसाधनाच्या योगानें किंवा संन्यास घेतल्यानें मुक्ति मिळविणें शक्य नाहीं. या संसारांतील असंख्य बंधनामध्येंच जो आनंद आहे, त्यापासून मुक्तीचा स्वाद घेतां येण्याजोगा आहे. तूं या मृण्मय पात्रामध्यें किंवा देहामध्यें वारंवार जीवनामृत ओतून मला वर्णगंधादि सुखानुभव घेण्याची ( पुनर्जन्माच्या योगानें ) संधि प्राप्त करून देतोस. हा विश्वांतील संसार तुझ्या तेजानें जो प्रकाशित झालेला आहे त्याच तेजाच्या ज्वालेवर हजारो दिवे पेटवून तुझ्या मंदिरांत समर्पण करतांच दशदिशा प्रकाशमान होतील. अर्थात् सर्व विश्व दृष्टिगोचर होईल. योगी होणें किंवा सिद्धी प्राप्त करून घेणें मला नको आहे. शब्दरूप, रस, गंध इत्यादिकांच्या योगानें प्राप्त होणारा आनंद तुझ्यापासूनच प्राप्त होत आहे असें समजून त्यांचा उपभोग घेईन. या आनंदाच्या ज्वालेंत मोहाचा नाश होतांच अंतःकरणांत तुझ्याविषयींचें अत्युत्कट प्रेम प्रकाशित होईल आणि त्याच काळीं भक्तिफलाची प्राप्ति होईल.

( बं. वैराग्य साधने मुक्तिसे आमार नय. )

*— गुरुदेव रविंद्रनाथ ठाकूर*

अनंतातुनी जा अनंतांत प्राण्या ।
परी अंत तेथेची येशी राहाण्या ॥
ऐकीव येथें येथील कहाण्या ।
घेऊन त्यामाजीं रसरंग-पूर्णा ॥
पेटीव ज्योती, परिपूर्ण तेजें ।
होवोत दीप्तीमय सर्व आत्मे ॥

'चालना' ऑगस्ट १९६०

# चार शब्द

माझे थोरले बंधू श्री. श्री. वि. गाडगीळ यांनीं आपल्या व्यावसायिक आयुष्याला प्रारंभ पत्रकार म्हणून केला. ' साप्ताहिक सकाळ ' व ' साप्ताहिक प्रभा ' यांचें संपादन सोडून त्यांनीं पुढे वकिलीचा पेशा पत्करला तरी त्यांचा साहित्याशीं संबंध तुटला नाहीं. टिळकवाड्यांत ते राहत असतां कवी यशवंत त्यांचे शेजारी होते. आजहि त्यांची वास्तु साहित्य परिषदेच्या शेजारीच आहे. आज ते ५३ व्या वर्षांत पदार्पण करीत आहेत. ह्या निमित्तानें त्यांचा काव्यसंग्रह प्रसिद्ध होत आहे. त्याला आपुलकीनें प्रस्तावना लिहून देऊन माझा आनंद द्विगुणित केल्याबद्दल मी त्यांचा अंतःकरणपूर्वक आभारी आहे. तसेंच माझे स्नेही श्री. विद्याधर गोखले यांचाहि मी त्यांनीं केलेल्या सहाय्याबद्दल आभारी आहे.

—पु. वि. गाडगीळ

REFBK-0011952

REFBK-0011952

प्रकाशक : पु. वि. गाडगीळ, मकरन्द साहित्य,
१९ पूर्णिमा, १३८, वडाळा, मुंबई ३१.

मुद्रक : चिंतामण रघुनाथ देसाई, न्यू भारत प्रिंटिंग प्रेस,
६, केळेवाडी, गिरगांव, मुंबई ४.